पीडीएफ़ वर डिजीटल सही    डिजीटल सही अस्तित्वात नाही



N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम १५४ अन्वये)

1. **District (जिल्हा):** सांगली    **P.S. (पोलीस ठाणे):** विटा    **Year (वर्ष):** 2022

   **FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0571    **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/12/2022 22:58 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

   1 **Day (दिवस):** मंगळवार    **Date from (दिनांक पासून):** 06/12/2022    **Date To (दिनांक पर्यंत):** 06/12/2022

   **Time Period (कालावधी):** प्रहर ५    **Time From (वेळेपासून):** 13:27 तास    **Time To (वेळेपर्यंत):** 13:27 तास

   (b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):**    **Date (दिनांक):** 06/12/2022    **Time (वेळ):** 22:58 तास

   (c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):**    **Entry No. (नोंद क्र.):** 041    **Date and Time(दिनांक आणि वेळ):** 06/12/2022 22:58 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

Scanned with OKEN Scanner

रूपये घेतल्याशिवाय नॉन क्रिमिलेयरचे प्रकरण प्रांत कार्यालयास पाठवणार नाहीत. अशी माझी खात्री झाली होती व मला त्यांना लाच देण्याची इच्छा नव्हती त्यामुळे मी अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयाकडील श्री.सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक यांचा संपर्क क्रमांक मिळवून त्यांना संपर्क केला व त्यांना माझ्या तक्रारी बाबत कळविले. त्याप्रमाणे घाटगे साहेब हे त्यांचे पथकासह विटा येथे आले व त्यांनी संपर्क करून कळविल्याप्रमाणे मी त्यांची 100 फुटी रोड विटा येथे जावून घाटगे साहेब यांची भेट घेतली. घाटगे साहेब यांनी त्यांचे सोबत आलेले श्री.विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक यांची ओळख करून दिली. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझा साळुंखे मॅडम यांचे विरूध्दचा तक्रारी अर्ज भिलारे साहेब यांचे समक्ष हजर केला. भिलारे साहेब यांनी त्यांचे ब्युरोच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती दिली. त्यांनी त्यांचे सोबत आलेले दोन शासकीय पंच तसेच त्यांचा स्टाफ यांची ओळख करून दिली.

भिलारे साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री. प्रकाश जयवंत जाधव यांची पंच नं. 1 म्हणुन व श्री. अमित मोहनराव शितोळे यांची पंच नं. 2 म्हणुन काम निवड केली. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली. भिलारे साहेब यांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला त्यांनी तो वाचून त्यावर सह्या केल्या.

भिलारे साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच जाधव यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच जाधव असे माझ्याकडील बजाज कंपनीची पल्सर एम.एच.10 सीसी 6026 या मोटरसायकलीवरून रवाना होवून प्रशासकीय इमारत विटा येथे दाखल झालो. मी माझी मोटर सायकल पार्कींगच्या ठिकाणी पार्क केली. त्यानंतर मी व पंच जाधव असे पायी चालत तहसील कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रामध्ये गेलो. त्या ठिकाणी साळुंखे मॅडम हजर नव्हत्या. तसेच कार्यालयामध्ये लोकांची गर्दी होती. मी व पंच जाधव असे काही वेळ त्या ठिकाणी थांबून राहीलो. काही वेळानंतर साळुंखे मॅडम कार्यालयात आल्या व कार्यालयातील डेस्कच्या पलीकडे त्यांचे खुर्चीवर जावून बसल्या. मी त्यांचेकडे माझ्या भावाच्या नॉन क्रिमिलेयर दाखल्याबाबत विचारले. त्यावेळी त्यं◌ानी मला सं◌ागीतलेले काय केले असे विचारले. त्यावर मी त्यांना काहीतरी कमी जास्त करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी तुमच्या इच्छेने बघा असे म्हणाल्या. त्यानंतर मी त्यांना दहा मिनीटात येतो असे म्हणून मी व पंच जाधव असे त्या ठिकाणावरून निघून आलो. मी व पंच जाधव असे भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झाल्यानंतर मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर भिलारे साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर भिलारे साहेब यांनी विचारले वरून पंच जाधव व त्यानंतर मी घडलेली हकिगत भिलारे साहेब यांना सांगीतली. त्यानंतर भिलारे साहेब, दोन्ही पंच तसेच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील माझ्यात व साळुंखे मॅडम यांचेत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये नागरी सुविधा केंद्रात आलेल्या लोकाच्या गर्दीमूळे माझ्यात व श्री.साळुंखे मॅडम यांचेत झालेले संभाषण स्पष्ट ऐकू आले नाही.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच जाधव यांना पुन्हा पडताळणी कामी सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझ्याकडे दिला. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच जाधव माझ्याकडील मोटर सायकलीवरून रवाना होवून तहसील कार्यालय विटा येथे जावून नागरी सुवीधा केंद्रात गेलो असता त्या ठिकाणी साळुंखे मॅडम हजर नव्हत्या. त्यानंतर मी त्या ठिकाणी हजर असलेल्या दुसया एका महिला कर्मचारी यांना साळुंखे मॅडम यं◌ाचे बाबत विचारले असता त्यांनी साळुंखे मॅडम निघून गेल्याचे सांगून उद्या सकाळी 10.00 वाजता येण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच जाधव असे त्या ठिकाणावरून निघून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर भिलारे साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर भिलारे साहेब यांनी विचारले वरून पंच

Scanned with OKEN Scanner

जाधव व त्यानंतर मी घडलेली हकिगत भिलारे साहेब यांना सांगीतली. त्यानंतर भिलारे साहेब, दोन्ही पंच तसेच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील माझ्यात व साळुंखे मॅडम यांचेत झालेले संभाषण ऐकले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी दि.06.12.2022 रोजी सकाळी 10.00 वाजता याच ठिकाणी हजर राहण्याबाबत सुचना देवून जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी निघून गेलो.

आज दि.06.12.2022 रोजी सकाळी 10.00 वाजता मी 100 फुटी रोड विटा या ठिकाणी येवून थांबलो. काही वेळाने भिलारे साहेब, घाटगे साहेब व त्यांचे पथक दोन पंचा सहीत मी थांबलो त्या ठिकाणी आले. त्यावेळी भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये मेमरी कार्ड टाकले. भिलारे साहेब यांनी मला व पंच जाधव यांना पडताळणी कामी आवश्यक सुचना दिल्या. भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून दोरीच्या सहाय्याने माझ्या गळ्यात अडकवला. मी रेकॉर्डर माझ्या शर्टच्या आत टाकला. त्यानंतर मी व पंच जाधव असे माझ्या मोटरसायकलीवरून रवाना होवून प्रशासकीय इमारतीच्या परीसरात दाखल होवून पार्कींग ठिकाणी माझी मोटर सायकल पार्क केली. मी व पंच जाधव असे पायी चालत तहसील कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रात गेलो. त्या ठिकाणी साळुंखे मॅडम हजर होत्या. मी त्यांची भेट घेवून माझ्या भावाच्या नॉन क्रिमीलेयर दाखल्याबाबत विचारून दाखला पंधरा तारखेच्या आत लागणार असल्यासे सं◌ागीतले. साळुंखे मॅडम यांनी दाखला 13 तारखेपर्यंत करून देत असल्याचे सं◌ागीतले. आमचेत दाखल्याच्या कामा संदर्भात चर्चा झाली. मी त्यांना आज काम होईल का असे विचारले. त्यावर साळुंखे मॅडम यांनी 10 तारखेपर्यंत होईल असे म्हणाल्या. मी साळु ◌ंखे मॅडम यं◌ाना काल आलो होतो असे सांगीतले त्यावर साळुंखे मॅडम यांनी मला माझी वाट बघून निघून गेल्याचे सांगीतले. साळुंखे मॅडम यांनी माझा भाऊ कधी येणार आहे असे विचारले. त्यावर मी त्यांना भाऊ येत असल्याचे सं◌ागीतले. मी साळुंखे मॅडम यांना काम करून देण्याबाबत विनंती केली. साळुंखे मॅडम यांनी माझ्याकडे हाताने पैशांबाबत खुणावून काय करायच ? असे विचारले. त्यावर मी त्यांना 2000/- रूपयामध्ये थोडे कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावर साळुंखे मॅडम यांनी मला "तुमच्या इच्छेने बघा" असे म्हणून नॉन क्रिमिलेयरच्या प्रकरणाचे कागदपत्रे दाखवून "हे पुढे तर पाठवावच लागणार" असे म्हणाल्या. मी साळुंखे मॅडम यांना 400-500 रूपये कमी करण्याबाबत विनंती करून माझी परीस्थिती नसल्याचे सांगीतले. त्यावर साळुंखे मॅडम यं◌ानी मला " तुम्हाला काय द्यायच ते द्या " असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना 1500/- रूपये देऊ का ? असे विचारले असता साळुंखे मॅडम यं◌ानी सुरवातील 1600/- रूपये असे म्हणून शेवटी 1700/- रूपये देण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच जाधव असे त्या ठिकाणावरून निघून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो.

मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर भिलारे साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर भिलारे साहेब यांनी विचारले वरून पंच जाधव व त्यानंतर मी घडलेली हकिगत भिलारे साहेब यांना सांगीतली. त्यानंतर भिलारे साहेब, दोन्ही पंच तसेच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील माझ्यात व साळुंखे मॅडम यांचेत झालेले संभाषण ऐकले. भिलारे साहेब यांनी पंचा समक्ष केले पडताळणी वेळी साळुंखे मॅडम यांनी माझ्याकडे 1700/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे साळुंखे मॅडम यांनी मागणी केले प्रमाणे त्यांना द्यावी लागणारी 1700/- रूपये रक्कम भिलारे साहेब यांचे समक्ष हजर केली. त्यावेळी सदर 1700/-रुपयाचे नोटांचे नंबर भिलारे साहेब यांनी एका कोया कागदावर पंचाचे समक्ष लिहून घेतले. त्यानंतर भिलारे साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचं◌ानी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी अ◌ॅथ्रासिन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर संकपाळ पोलीस यांनी 1700/- रुपये रकमेच्या नोटांना अ◌ॅथ्रासिन पावडर लावून सदरची लाच रक्कम माझ्या शर्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये नवीन कार्ड टाकले. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या सुचना दिल्या.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दोरीच्या सहाय्याने माझ्या गळ्यात अडकवले ते मी माझ्या शर्टच्या आतील बाजूस टाकले. मी व पंच जाधव असे माझ्याकडील मोटरसायकली वरून रवाना होऊन प्रशासकीय इमारत विटा या ठिकाणी जावून माझी मोटरसायकल पार्कींग ठिकाणी पार्क केली. त्यानंतर मी व पंच जाधव असे पायी चालत तहसील कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रात गेलो. त्या ठिकाणी साळुंखे मॅडम हजर होत्या. मी त्यांची भेट घेवून त्यंाना सांगीतल्याप्रमाणे आणले असल्याचे सांगीतले. साळुंखे मॅडम यांनी मला माझ्या भावाबाबत विचारले असता मी त्यांना भाऊ नाष्टा करायला गेला असल्याचे कारण सांगीतले. मी साळुंखे मॅडम यांना नॉनक्रिमीलेयर दाखल्याबाबत विचारून लवकरात लवकर होईल का असे विचारले. त्यावर साळुंखे मॅडम यंानी मला "कस केलय काय केल कुणाला सांगू नका" असे म्हणाल्या. त्यानंतर साळुंखे मॅडम यांनी त्यांचे मोबाईलवरून कोणालातरी कॉल केला व त्यास पटकन कोर्टाच्या बाहेर येण्यास सांगीतले. त्यानंतर साळुंखे मॅडम यांनी मला बाहेर येण्याबाबत इशारा केला व त्या नागरी सुविधा केंद्राच्या बाहेर जाऊ लागल्या. मी व पंच जाधव असे साळुंखे मॅडम यांचे सोबत नागरी सुवीधा केंद्राच्या परिसरातून तसेच प्रशासकीय इमारतीच्या बाहेर आलो. आमचेत चालत चालत कामा संदर्भात चर्चा झाली. साळुंखे मॅडम प्रशासकीय इमारतीच्या बाहेर विटा पोलीस ठाणेचे काही अंतर अलीकडे रोडवर थांबल्या. त्या ठिकाणी एक अनोळखी इसम मोटरसायकलीवर थांबलेले होते. त्या इसमाने साळुंखे मॅडम यंाना "यांना पाहिजे होय" असे विचारून त्या इसमाने मला "उत्पन्नाचा दाखला वगैरे सगळ काढलय का" असे विचारले. मी त्यंाना सगळे काढले असल्याचे सांगीतले. साळुंखे मॅडम यांनी मला तक्रार वगैरे काय नसल्यास द्या आमच्या पोटावर पाय देऊन काय गरज नाही अश्या म्हणाल्या. त्यावेळी मोटरसायकलीवर थांबलेल्या इसमाने मला "आम्ही तुम्हाला माग

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** santosh gundopant doke **(पोलीस निरीक्षक) or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Scanned with OKEN Scanner

Bmadane PN1685

पो.स्टे.ऑफिसर
विटा पोलीस ठाणे

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): santosh gundopant doke

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): SGDM7903

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील)

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची( सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | 1970 | | | | चेचक: होय |
| 2 | पुरुष | 1994 | | | | चेचक: होय |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्ट्ये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

Scanned with OKEN Scanner